सद्रक्षाय खलनिग्रहणाय

जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्तालय,

ठाणे शहर

इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in

भ्रमरध्वणी क्र.9819208279

प्रेसनोट **दि.०४/०९/२०२५**

‘‘ सन २०२५ गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद पोलीस बंदोबस्ताबाबत माहिती’’

सालाबादप्रमाणे ठाणे पोलीस आयुक्तालयात **दिनांक ०५/०९/२०२५ ते दिनांक ०८/०९/२०२५** या दरम्यान **हिंदू बांधवांचा गणेशउत्सव** तसेच **मुस्लिम बांधवांचा ईद-ए-मिलाद** हे सण साजरे होणार आहेत. त्यादरम्यान मोठया प्रमाणावर मिरवणुका निघणार आहेत. सदर उत्सवादरम्यान नागरिकांमध्ये अतिशय उत्साहाचे व धार्मिक वातावरण असते. त्यावेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवुन शांतताभंग होणार नाही या दृष्ट्रीकोनातुन जास्तीत जास्त पोलीस मनुष्यबळ तसेच साधनसामुग्रीचा वापर करण्यात येणार आहे.

गणेशउत्सव विसर्जन मिरवणुकीत तसेच ईद-ए-मिलाद या सणांच्या वेळी मोठया प्रमाणात गर्दी होत असते. त्यावेळेस गर्दीचा फायदा घेवुन चैन/मोबाईल/पर्स/बॅग स्नॅचिंग होवु नये, कार्यक्रमासाठी येणा-या नागरिकांच्या मोटारवाहनांची चोरी होवु नये तसेच धार्मिक भावना दुखावुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये या दृष्ट्रीकोनातुन विशेष शाखा व गुन्हे शाखेमधील साध्या वेशातील जास्तीत जास्त पुरूष/महिला पोलीस अंमलदार यांची वेगवेगळी पथके नेमलेली आहे.

सदर कालावधीत धार्मिक तेढ निर्माण करणारे मॅसेजेस/पोस्ट, व्हिडीओ सोशल मिडीयावर टाकुन काही समाजकंटक समाजात धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतात. अशा समाजकंटकावर लक्ष ठेवुन त्वरीत कायदेशीर कारवाई करण्यासाठी ठाणे पोलीस आयुक्तालयाचे सोशल मिडीया सेल देखील सर्तक करण्यात आले आहे. तसेच असे काही मॅसेजेस, पोस्ट, व्हिडीओ बाबत माहिती मिळाल्यास त्वरीत नजिकच्या पोलीस ठाण्यास संपर्क साधण्याबाबत मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचेकडुन जनतेला अवाहन करण्यात येत आहे.

सदर **हिंदू बांधवांचा गणेशउत्सव** तसेच **मुस्लिम बांधवांचा ईद-ए-मिलाद** हे सण शांततेत पार पडावे या अनुषंगाने पोलीस उप आयुक्त-११, सहाय्यक पोलीस आयुक्त-२६, पोलिस निरीक्षक-१००, तसेच ७००० पेक्षा जास्त पोलीस अधिकारी/अंमलदार व मुंबई येथुन पोलीस निरीक्षक-१० आणि सहायक पोलीस निरीक्षक-५, मुंबई लोहमार्ग-५० पोलीस अंमलदार, होमगार्ड-८००, एस.आर.पी.एफ.-२ कंपन्या असा बंदोबस्त नेमण्यात आलेला असुन सदर बंदोबस्ताच्या वेळी सर्व ठिकाणांवर ड्रोनचा प्रभावी वापर करण्यात येणार आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर